जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 7 JUN 2021
सकाळ



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात पर्यावरण दिनानिमित्त कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते वृक्ष व वेलींचे रोपण करण्यात आले. यावेळी उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्रा. डॉ. आसावरी जाधव.

# शाश्वत विकास गरजेचा : शिर्के

कोल्हापूर, ता. ६ : पृथ्वीतलावर ज्याप्रमाणे इतर प्राणी आहेत, त्याप्रमाणेच एक मनुष्यप्राणी आहे. त्यामुळे माणसाने आपण वसुंधरेचे मालक नसून पृथ्वीवर आलेल्या एका पाहुण्याप्रमाणे राहावे. मालकी हक्क गाजवू नये. शाश्वत विकासाची कास धरून इथून पुढे तरी वसुंधरेवर होणारे आघात थांबवावेत, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातील वेबिनारमध्ये ते बोलत होते.

कुलगुरूंच्या हस्ते विद्यापीठात वृक्ष आणि वेलीचे रोपण करण्यात आले. पर्यावरण विभागाने 'परिसंस्थेचे पुनर्जीवीकरण' या विषयावर वेबिनारचे आयोजन केले होते. यामध्ये जैवविविधता तज्ज्ञ प्रा. डॉ. मनोज बोरकर यांनी मार्गदर्शन केले. 'तारांतुला' कोळ्यांचे परिसंस्थेतील स्थान आणि त्याची संकटे यावर प्रकाश टाकला. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, "आपल्या प्रत्येक कृतीचा परिणाम होत असतो. माणसाने आपण वसुंधरेचे मालक नसून एका पाहुण्याप्रमाणे राहावे. मालकी हक्क न गाजवता शाश्वत विकासाची कास धरून यापुढे तरी वसुंधरेवर होणारे आघात थांबवावेत." पर्यावरणशास्त्र विभागप्रमुख डॉ. आसावरी जाधव यांनी स्वागत आणि प्रास्ताविक केले. प्राजक्ता सरकाळे हिने सूत्रसंचालन केले. डॉ. पल्लवी भोसले यांनी आभार मानले.

07 JUN 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर






कोल्हापुरात रविवारी शिवस्वराज्य दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य अश्वारुढ पुतळ्यास सकाळी ११ वाजता कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी शेजारी डावीकडून व्ही. टी. पाटील, पी. टी. गायकवाड, ए. एम. गुरव, एस. एम. देशमुख, एस. एस. महाजन, आर. व्ही. गुरव, अभय जायभाये, जी. आर. पळसे, आदी उपस्थित होते. दुसऱ्या छायाचित्रात नेसरी (ता. गडहिंग्लज) ग्रामपंचायतीत शिवराज्याभिषेक दिनानिमित्त गुढीपूजनावेळी सरपंच आशिषकुमार साखरे, उपसरपंच अमर हिडदुगी, ग्रामविकास अधिकारी पी. बी. पाटील, प्रकाश मुरकुटे, विलास हल्याळी, अब्दुलरौफ मुजावर, आदी उपस्थित होते.

०६ JUN 2021
लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वातंत्र्य, सहिष्णुता मूल्यांवर शिवछत्रपतींचे स्वराज्य अधिष्ठित

## इंद्रजित सावंत : शिवाजी विद्यापीठातील ऑनलाईन व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : अठरापगड जातींमध्ये विखुरलेल्या एतद्देशीय भूमिपुत्रांची गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना केली. स्वातंत्र्य आणि सहिष्णुता या मूल्यांवर महाराजांचे स्वराज्य अधिष्ठित होते, असे प्रतिपादन इतिहास संशोधक इंद्रजित सावंत यांनी रविवारी येथे केले.

शिवस्वराज्य दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

रयतेची काळजी वाहणारा शिवाजी महाराजांसारखा दुसरा राजा जगाच्या पाठीवर झाला नाही. म्हणूनच त्यांना राष्ट्रनिर्माता म्हटले जाते. परचक्राच्या कालखंडात प्रजेला आसरा देण्यासाठी किल्ल्यांचा वापर करणारा शिवाजी महाराजांसारखा अन्य राजा होणे नाही. म्हणूनच आजही भूमिपुत्रांच्या मनात त्यांच्याविषयीचा आदरभाव कमालीचा ओसंडून वाहत असल्याचे सावंत यांनी सांगितले. भाषेचे सांस्कृतिक व्यवहारातील महत्त्व आणि परकीय भाषेद्वारे येणारी सांस्कृतिक गुलामगिरी या गोष्टी जाणून आपल्या कारभारात, पत्रव्यवहारात मराठी भाषेचा वापर, परकीय शब्दांना पर्यायी मराठी शब्दांचे उपयोजन केले. राजव्यवहार कोषाची निर्मिती त्यासाठी केली. त्यामध्ये एतद्देशीयांच्या बोलीमधील शब्दांचा परकीय शब्दांना पर्याय म्हणून समावेश केला. आपल्या संपूर्ण व्यवहारांमध्ये त्यांची प्रभावी अंमलबजावणी केली. धार्मिक सहिष्णुता, रयतेप्रती कळवळा, कर्तव्यकठोर पण सर्वसामान्य व्यक्ती केंद्रस्थानी असणारी प्रशासकीय व्यवस्था, प्रजेसाठी धनधान्य वाटपापासून ते जल व्यवस्थापनापर्यंत सर्व गोष्टींची काळजी वाहणारी महसुली व्यवस्था ही शिवरायांच्या स्वराज्याची वैशिष्ट्ये होती,असे ते म्हणाले.

शिवाजी विद्यापीठ महाराजांचा वारसा कसोशीने जोपासण्याचा प्रयत्न करत असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.



शिवस्वराज्य दिनानिमित्त विद्यापीठातर्फे आयोजित ऑनलाईन व्याख्यानात इंद्रजित सावंत यांनी मनोगत व्यक्त केले.

### एकमेव शककर्ते

शालिवाहनानंतर शकनिर्मिती करणारे शिवाजी महाराज एकमेव शककर्ते ठरले. राज्याभिषेकाच्या दिवसापासून त्यांनी या 'श्री राज्याभिषेक शका'ची सुरुवात केली. पुढे सुमारे दीडशे वर्षे हा शक अंमलात राहिला असल्याचे इंद्रजित सावंत यांनी सांगितले.

### शिवपुतळ्याला अभिवादन

- शिवाजी विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य अश्वारुढ पुतळ्याला सकाळी अकरा वाजता कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, आदींनी अभिवादन केले.
- यावेळी वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 7 JUN 2021
पुढारी

## शिवाजी विद्यापीठात शिवस्वराज्य दिन साजरा

विद्यापीठाच्या प्रांगणातील छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य अश्वारूढ पुतळ्यास कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह अधिकारी, शिक्षकांनी पुष्प वाहून अभिवादन केले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे संचालक डॉ. एम. एस. देशमुख, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक अभय जायभाये आदी उपस्थित होते.

07 JUN 2021

पुढारी


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भूमिपुत्रांच्या कल्याणासाठी शिवरायांकडून स्वराज्याची स्थापना

## इंद्रजित सावंत; विद्यापीठात शिवस्वराज्य दिनानिमित्त विशेष व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड जातींत विखुरलेल्या भूमिपुत्रांची गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी स्वराज्याची स्थापना केली होती. स्वातंत्र्य व सहिष्णुता या मूल्यांवर महाराजांचे स्वराज्य अधिष्ठित होते, असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांनी केले.



**कोल्हापूर : ऑनलाईन व्याख्यानात बोलताना इंद्रजित सावंत.**

शिवस्वराज्य दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' यूट्यूब वाहिनीवरून प्रसारित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. सावंत म्हणाले, रयतेची काळजी वाहणारा शिवाजी महाराजांसारखा दुसरा राजा जगाच्या पाठीवर झाला नाही. भाषेचे सांस्कृतिक व्यवहारातील महत्त्व आणि परकीय भाषेद्वारे येणारी सांस्कृतिक गुलामगिरी या गोष्टी जाणून कारभारात, पत्रव्यवहारात मराठी भाषेचा वापर, परकीय शब्दांना पर्यायी मराठी शब्दांचे उपयोजन या बाबी महाराजांनी जाणीवपूर्वक केल्या.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिवरायांनी देशात सर्वप्रथम स्वराज्याचे स्वप्न पाहिले. गोरगरिबांपासून ते सरदारांपर्यंत प्रत्येकाला त्यांच्या जबाबदारीची जाणीव करून देण्याची भूमिका त्यामागे होती. धार्मिक सहिष्णुता, रयतेप्रती कळवळा, सर्वसामान्य व्यक्ती केंद्रस्थानी असणारी प्रशासकीय व्यवस्था, प्रजेसाठी धनधान्य वाटपापासून ते जलव्यवस्थापनापर्यंत सर्व गोष्टींची काळजी वाहणारी महसुली व्यवस्था ही स्वराज्याची महत्त्वाची वैशिष्ट्ये होती. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

0 7 JUN 2021
सकाळ

# छत्रपती शिवराय हे राष्ट्रनिर्माते : इंद्रजित सावंत


कोल्हापूर, ता. ६ : 'छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना अठरापगड जातींत विखुरलेल्या एतद्देशीय भूमिपुत्रांची गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी केलेली होती. स्वातंत्र्य व सहिष्णुता या मूल्यांवर महाराजांचे स्वराज्य अधिष्ठित होते, शिवाजी महाराज हे राष्ट्रनिर्माते होते,' असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत यांनी केले. शिवराज्याभिषेक दिनानिमित्त सावंत यांचे व्याख्यान विद्यापीठाने आयोजित केले होते. यावेळी ते बोलत होते.

श्री. सावंत म्हणाले, ''रयतेची काळजी वाहणारा शिवाजी महाराजांसारखा दुसरा राजा जगाच्या पाठीवर झाला नाही. म्हणूनच त्यांना राष्ट्रनिर्माता म्हटले जाते. रयतेच्या शेतातील काडीसही हात लावू नका. अन्यथा तुमच्यापेक्षा मोंगल बरे, अशी भावना निर्माण होईल, असे आपल्या सैन्यास बजावतानाच पिचलेल्या शेतकऱ्यांना हर तऱ्हेने मदत करण्याचे धोरणही महाराजांनी राबविले. अवर्षण स्थितीतून शेतकऱ्यांना सावरण्यासाठी त्यांना कसण्यासाठी जमीन द्या, पेरण्यासाठी बीज द्या, नांगरण्यासाठी बैल द्या, पीक उगवेपर्यंत, त्यांना पोटापाण्यासाठी धान्य द्या आणि परतवसुली बिनव्याजी करा, असे महाराजांनी सुभेदारांना आदेश दिल्याची पत्रे आहेत. जगाच्या इतिहासात असे दुसरे उदाहरण शोधूनही सापडणार नाही. त्याचप्रमाणे जगाच्या पाठीवर गडकोट, किल्ले, दुर्ग बांधणारे अनेक राजे आहेत. मात्र, परचक्राच्या कालखंडात प्रजेला आसरा देण्यासाठी त्या किल्ल्यांचा वापर करणारा शिवाजी महाराजांसारखा अन्य राजा होणे नाही. म्हणूनच आजही भूमिपुत्रांच्या मनात त्यांच्याविषयीचा आदरभाव कमालीचा ओसंडून वाहतो.'

विद्यापीठाच्या शिव-वार्ता या यूट्यूब चॅनेलवरून हे व्याख्यान प्रसारित झाले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी स्वागत केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
07 JUN 2021
तरुण भारत

# स्वातंत्र्य, सहिष्णुतेच्या मूल्यावर स्वराज्य स्थापना



- इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

रयतेची काळजी वाहणारा छत्रपती शिवाजी महाराजांसारखा दुसरा राजा जगाच्या पाठीवर झाला नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना अठरापगड जातींत विखुरलेल्या एतद्देशीय भूमिपुत्रांची गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी केलेली होती. स्वातंत्र्य व सहिष्णुता या मूल्यांवर महाराजांचे स्वराज्य अधिष्ठित होते, असे प्रतिपादन इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांनी रविवारी केले.

शिवस्वराज्य दिनानिमित्त शिवाजी विद्यापीठातर्फे आयोजित विशेष ऑनलाईन व्याख्यानात ते बोलत होते. विद्यापीठाच्या 'शिव-वार्ता' युट्यूब वाहिनीवरुन प्रसारित झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. त्यांच्याहस्ते विद्यापीठातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

सावंत म्हणाले, आपल्या सैन्यांना रयतेच्या शेतातील काडीलाही हात लावू दिला नाही. स्वराज्यातील शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदत केली. अवर्षण स्थितीतून शेतकऱ्यांना सावरण्यासाठी त्यांना कसण्यासाठी जमीन द्या, पेरण्यासाठी बीज द्या, नांगरण्यासाठी बैल द्या, पीक उगवेपर्यंत त्यांना पोटापाण्यासाठी धान्य द्या आणि परत वसुली बिनव्याजी करा, असे महाराजांनी आपल्या सुभेदारांना आदेश दिल्याची पत्रे आहेत. पत्रव्यवहारात मराठी भाषेचा वापर, परकीय शब्दांना पर्यायी मराठी शब्द दिले. राजव्यवहार कोषाची निर्मिती त्यासाठी केली. शालिवाहनानंतर शकनिर्मिती करणारे शिवाजी महाराज एकमेव शककर्ते ठरले. राज्याभिषेकाच्या दिवसापासून त्यांनी या श्री राज्याभिषेक शकाची सुरुवात केली.

जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी आभार मानले. व्याख्यानात प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, वित्त व लेखाधिकारी व्ही. टी. पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे, अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, अभय जायभाये, डॉ. ए. एम. गुरव, क्रीडा विभागप्रमुख डॉ. पी.टी. गायकवाड, डॉ. पी. एन. वासंबेकर, डॉ. ए. एम. सरवदे उपस्थित होते.

**शिवरायांच्या विचारांचा वारसा...**

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांना 'जाणता राजा' म्हटले गेले कारण ते खऱ्या अर्थाने सर्वसामान्य रयतेचे राजे होते. शिवरायांच्या विचारांचा वारसा जपत बहुजनांच्या घरोघरी शिक्षणाच्या ज्ञानगंगेचा प्रवाह घेऊन जाण्याचे कार्य शिवाजी विद्यापीठ करीत आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 7 JUN 2021

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठातील ३० जणांना पदोन्नती

कोल्हापूर : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठातील रखडलेल्या पदोन्नतीचा निर्णय अखेर घेतला आहे. यामध्ये ३० जाणांना सेवाज्येष्ठतेनुसार उपकुलसचिव, सहाय्यक कुलसचिव, अधीक्षकपदी पदोन्नती देण्यात आली आहे. उपकुलसचिव, सहाय्यक कुलसचिव, अधीक्षक, सहाय्यक अधिक्षक, वरिष्ठ लिपिक, कनिष्ठ लिपिक, जमादार, हवालदार, ग्रंथालय परिचर आदी पदांचा समावेश आहे. विद्यापीठाने ३० जणांना रोस्टर पद्धतीने पदोन्नती दिल्याने अनेकांना दिलासा दिला आहे.